महाराष्ट्र शासन
(स्थापीत)
नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर
**NAGPUR DISTRICT SECURITY GUARD BOARD NAGPUR.**
240, भोसला चेम्बंर, सिव्हील लाईन, नागपूर 4400 01
दुरध्वनी कंमाक 2560862, 2557142, फॅक्स 2557405
**Constituted under Section 6 of the Maharashtra Private Security Guard (Regulation of Employment and Welfare) Act 1981.**

---

जा.क.नाजिसुरम–नाग / वेतनदर आदेश / /2017 दिनांक : 13/2/17

# आ दे श

विषय :– सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक / अधिकारी यांचे वेतन व भत्यांमध्ये दि. 01.11.2016 पासुन सुधारणा करणेबाबत.

संदर्भ :– शासन आदेश कंमाक एसजीए–2016 / प्र.क.405 / कामगार–5 दि. 10 जानेवारी 2017

सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते निश्चित करण्याबाबत, खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना 2002 मधील खंड 30 मधील तरतुदीनुसार मंडळास अधिकार प्रदान करण्यांत आले आहेत. सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चित करण्यासाठी मंडळाने किमान वेतन अधिनियम, 1948 अतंर्गत "दुकाने व व्यापारी आस्थापना" मधील कामगारांना लागू असलेले किमान वेतनाचे दर हे आधारभूत प्रमाण मानण्याचे स्वीकारले आहे. त्यानुसार सदर अनुसूचीत उद्योगधंद्यामधील कामगारांसाठी शासनातर्फे वेळोवेळी जाहीर होणारा विशेष भत्ता मंडळातील नोंदित सुरक्षा रक्षकांना अदा करण्यांत येतो. त्याच प्रमाणे सुरक्षा रक्षकांचे प्रतिनिधित्व करणा–या सुरक्षा रक्षक संघटनांनी केलेल्या मागणी नुसार सुरक्षा रक्षकांच्या वेतनात वेळोवेळी वाढ करण्यांत आलेली आहे. नोंदीत सुरक्षा रक्षकांचे सध्याचे एकुण वेतन रू 10584.00 इतके आहे.

मंडळातील सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्ते यामध्ये वाढ करणेसाठी विविध सुरक्षा रक्षक संघटनांनी निवेदनाद्वारे केलेल्या मागणी संदर्भात, मंडळाने महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, 2002 मधील खंड 30 चे उपखंड (2) मधील तरतुदीनुसार नागपूर, भंडारा, गोंदिया व वर्धा जिल्हा कार्यक्षेत्रामधील मुख्य मालकांच्या विविध संघटना / असोसिएशन्स यांना पत्राद्वारे कळवून त्यांना एक महिन्याच्या मुदतीमध्ये सुरक्षा रक्षकांचे वेतन, भत्ते व इतर सेवा–शर्ती संबंधात निवेदने सादर करण्याबाबत आव्हानीत करण्यांत आले होते.

तथापी मालकांच्या काही संघटना / असोसिएशनकडून उपरोक्त जाहीर सुचना / प्रकटनास अनुसरून निवेदन / प्रस्ताव मंडळाकडे प्राप्त झाले होते व ते शासनास पाठविले होते.

मंडळातील सुरक्षा रक्षकांना सध्या मिळत असलेले किमान वेतन ( मुळ वेतन + विशेष भत्ता / महागाई भत्ता) तसेच जीवनावश्यक वस्तुंच्या दरामध्ये आणि प्रवास खर्च व घर भाडयामध्ये झालेली वाढ याबाबत सर्वकष विचार करून त्याचप्रमाणे वेतन व भत्यामध्ये सुधारणा केल्यावर वाढीव वेतन व त्यावरील लेव्ही मिळून एकत्रितरित्या मुख्य मालकावर किती भार पडेल याबाबत विचार करून मंडळाने सुरक्षा रक्षकांच्या वेतन व भत्यामध्ये वाढ करण्याबाबत दि.29.01.2016, 16.03.2016 रोजीच्या पत्रान्वये मा. कामगार आयुक्त, मुंबई यांना प्रस्तावीत केले होते. त्यानुसार प्रभारी सह आयुक्त कामगार,

.. 2

मुंबई यांनी शासनास केलेल्या शिफारसी नुसार सदर प्रस्तावास अनुसरून शासनाने मंडळातील सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्त्यामध्ये खालील प्रमाणे वेतनवाढ करण्यास मान्यता दिलेली असुन सदर वेतनवाढ ही दि. 01 नोव्हेबंर 2016 पासुन लागू करण्याबाबत शासन आदेश कंमाक एसजीए–2016/प्र.क. 405/कामगार–5 दि. 10 जानेवारी 2017 अन्वये निर्देशित करण्यांत आले आहे. शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार नोंदीत सुरक्षा रक्षकांचे वेतन व भत्त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत मंडळाने दि. 18 जानेवारी 2017 रोजी ठरावाद्वारे निर्णय घेतला असुन सुधारीत वेतन व भत्ते खालील प्रमाणे निश्चित करण्यांत आले आहेत.

1) मुळ वेतन :

| अ.क | पद/हुद्दा | सुधारीत मुळ वेतनाचे दर |
|---|---|---|
| 1. | सुरक्षा रक्षक/महिला सुरक्षा रक्षक | 6900.00 |
| 2. | मुख्य सुरक्षा रक्षक | 7175.00 |
| 3. | सुरक्षा पर्यवेक्षक | 7875.00 |
| 4. | सहाय्यक सुरक्षा अधिकारी | 8100.00 |
| 5. | सुरक्षा अधिकारी | 8550.00 |
| 6. | मुख्य सुरक्षा अधिकारी | 9000.00 |

सदरचे दर दि. 01 नोव्हेबंर, 2016 पासुन नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नागपूर मंडळाच्या कार्यक्षेत्रा अतंर्गत असलेल्या नागपूर, भंडारा, गोंदिया व वर्धा जिल्हयाकरीता लागू असतील.

2) विशेश भत्ता (महागाई भत्ता) : मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतन अधिनियम, 1948 मधील "दुकाने व व्यापारी संस्था" अनुसूचित रोजगारासाठी लागू असलेला महागाई भत्ता लागू राहील.

सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, 1948 मुंबई यांनी त्यांचे आदेश कं. ग्रा–वि/विवेअ/वि.भ./2017–1/कार्या–10 दि. 04.02.2017 दर रू. 3256.20 (01.01.2017 ते 30.06. 2017 करीता) निश्चित केला आहे.

3) घरभाडे भत्ता :– उपरोक्त किमान वेतनाशिवाय (मुळ वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता मिळून) मंडळाच्या नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिका–यांना त्यांचे किमान वेतनावर 5 टक्के ऐवजी 10 टक्के घरभाडे भत्ता देय राहील.

4) प्रवास भत्ता :– सर्व सुरक्षा रक्षक /अधिका–यांना रू 250.00 ऐवजी रू 300.00 दरमहा इतका प्रवास भत्ता लागू करण्यांत आलेला आहे.

5) धुलाई भत्ता :– सर्व सुरक्षा रक्षक /अधिका–यांना रू 300.00 ऐवजी रू 400.00 दरमहा इतका धुलाई भत्ता लागू करण्यांत आलेला आहे.

6) शैक्षणिक भत्ता :– सुरक्षा रक्षकांच्या पाल्याच्या शिक्षणासाठी सर्व नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना रू 400.00 दरमहा इतका शैक्षणिक भत्ता नव्याने लागू करण्यांत आला आहे.

7) सुरक्षा रक्षकांना निश्चित केलेले वेतन व भत्ते हे 8 तासाच्या कामासाठी असुन अतिकालीन कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मुळ वेतन + विशेष भत्ता) दुप्पट दराने देय राहील.

8) सुरक्षा रक्षकांचे वेतनाची पध्दत ही सुरक्षा रक्षकांचे मुळ वेतन + विशेष भत्ता (महागाई भत्ता) या मासिक वेतनदरास 26 ने भागून येणारा भागाकार हा त्याचा प्रतिदिन वेतनदर समजावा.

9) नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळा मार्फत ज्या आस्थापनेत माजी सैनीक सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक कार्यरत आहेत त्यांना जी वेतनवाढ सिव्हील सुरक्षा रक्षकांच्या/पर्यवेक्षकांच्या वेतनात झाली आहे तीच वाढ माजी सैनीक सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक यांचे वेतनात होईल.

10) लेव्हीच्या दरात अथवा संरचनेत कोणताही बदल केलेला नसुन लेव्हीचे दर पुर्वी प्रमाणेच म्हणजे (मुळ वेतन + विशेष भत्ता(महागाई भत्ता) यावर 40.00 टक्के राहतील.

| अ.क. | खातेनिहाय विगतवारी | जेथे राज्य विमा योजना लागू नाही |
|---|---|---|
| 1. | भविष्य निर्वाह निधि | 12.00 टक्के |
| 2. | उपदान | 4.00 टक्के |
| 3. | सानुग्रह अनुदान | 8.33 टक्के |
| 4. | सवेतन सुट्टया | 4.00 टक्के |
| 5. | सुट्टया (रजा) | 1.25 टक्के |
| 6. | गणवेश | 3.00 टक्के |
| 7. | आस्थापना खर्च | 5.00 टक्के |
| 8. | राखीव निधि | 0.67 टक्के |
| 9. | कामगार क्षतीपुर्ती | 0.75 टक्के |
| 10. | वैद्यकीय खर्च | 1.00 टक्का |
| | एकुण | 40.00 टक्के |

<u>सुरक्षा रक्षकांना दि. 01 नोव्हेबंर 2016 पासुन लागू करण्यांत आलेले सुधारीत वेतन व भत्ते (रूपयात)</u>

| अ. क | पद | मुळ वेतन | विशेष भत्ता दि. 01.01. 2017 पासुन | घरभाडे भत्ता 10 टक्के | प्रवास भत्ता दरमहा 300/- | धुलाई भत्ता दरमहा 400/- | शैक्षणिक भत्ता दरमहा 400/- | एकुण वेतन | देय लेव्ही 40 टक्के | वेतन व लेव्हीची एकुण बेरीज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | सुरक्षा रक्षक / महिला सुरक्षा रक्षक | 6900.00 | 3256.20 | 1015.62 | 300.00 | 400.00 | 400.00 | 12271.82 | 4062.48 | 16334.30 |
| 2. | मुख्य सुरक्षा रक्षक | 7175.00 | 3256.20 | 1043.12 | 300.00 | 400.00 | 400.00 | 12574.32 | 4172.48 | 16746.80 |
| 3. | सुरक्षा पर्यवेक्षक | 7875.00 | 3256.20 | 1113.12 | 300.00 | 400.00 | 400.00 | 13344.32 | 4452.48 | 17796.80 |
| 4. | सहाय्यक सुरक्षा अधिकारी | 8100.00 | 3256.20 | 1135.62 | 300.00 | 400.00 | 400.00 | 13591.82 | 4542.48 | 18134.30 |
| 5. | सुरक्षा अधिकारी | 8550.00 | 3256.20 | 1180.62 | 300.00 | 400.00 | 400.00 | 14086.82 | 4722.48 | 18809.30 |
| 6. | मुख्य सुरक्षा अधिकारी | 9000.00 | 3256.20 | 1225.62 | 300.00 | 400.00 | 400.00 | 14581.82 | 4902.48 | 19484.30 |

.. 4

| अ. क्र | पद | मुळ वेतन + विशेष भत्ता मिळुन प्रतिदिन वेतन रूपये | मुळ वेतन +विशेष भत्ता+घरभाडे भत्ता+प्रवास भत्ता+धुलाई भत्ता+शैक्षणिक भत्ता+लेव्ही मिळून प्रतिदिन वेतन रूपये |
|---|---|---|---|
| 1. | सुरक्षा रक्षक / महिला सुरक्षा रक्षक | रू 390.61 | रू 628.21 |
| 2. | मुख्य सुरक्षा रक्षक | रू 401.20 | रू 644.10 |
| 3. | सुरक्षा पर्यवेक्षक | रू 428.12 | रू 684.48 |
| 4. | सहाय्यक सुरक्षा अधिकारी | रू 436.78 | रू 697.46 |
| 5. | सुरक्षा अधिकारी | रू 454.08 | रू 723.43 |
| 6. | मुख्य सुरक्षा अधिकारी | रू 471.39 | रू 749.40 |

- किमान वेतन = मुळ वेतन + विशेष भत्ता / महागाई भत्ता

सबब मंडळातील सर्व नोंदीत मुख्य मालकांना निर्देशीत करण्यांत येते की, वितरीत केलेल्या सुरक्षा रक्षक / अधिकारी यांचे वर दर्शविल्या नुसार सुधारीत दराने वेतन व लेव्ही मंडळास अदा करण्यांत यावी.

सचिव
नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ
नागपूर यांचे करिता

प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :

The Manager

Vidarbha Industries
we serve industrial services...